


# पारनेर दर्शन




वर्ष १ अंक १३८, शुक्रवार ९ फेब्रुवारी २०२४ ■ संपादक : देविदास आबूज ■ कार्यकारी संपादक : विजय वाघमारे RNI No.MAHMAR/2015/61493 किंमत : ३ रुपये

## भाऊसाहेब महाराज संस्थेतील शिक्षक भरतीस स्थगिती द्या

### ■ प्रशासकाच्या नियुक्तीचीही मागणी ■ संस्थापक संचालकांचे उपसंचालकांना निवेदन

**वासुंदे : प्रतिनिधी**

**वासुंदे येथील भाऊसाहेब महाराज शिक्षण प्रसारक संस्थेबाबत पुणे धर्मदाय आयुक्त कार्यालयाकडे प्रकरण प्रलंबित असताना सुरू करण्यात आलेल्या बेकायदेशीर शिक्षक भरतीला तातडीने स्थगिती देण्याची मागणीसंस्थापक संचालक भागुजीदादा झावरे, संस्थापक सचिव सदाशिव तनपुरे, धोंडीभाऊ आहेर, पोपट साळुंके, शरद झावरे यांनी शिक्षण उपसंचालक राजेंद्र आहेर यांच्याकडे केली आहे.**

भाऊसाहेब महाराज शिक्षण संस्थेची शिक्षण विभागाच्या माध्यमातूनही चौकशी सुरू असताना शिक्षक भरती तातडीने थांबविण्यात यावी अशी मागणीही शिक्षण विभागाकडे करण्यात आली आहे.

यासंदर्भात प्रसिध्दीस देण्यात आलेल्या निवेदनात नमुद करण्यात आले आहे की, दि. ७ फेब्रुवारी २०२४ रोजी या शिक्षण संस्थेच्या शिक्षक भरती संदर्भात वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिध्द करण्यात आली आहे. या संस्थेची शिक्षण विभागाकडून चौकशी सुरू असून धर्मादाय आयुक्त पुणे व नगर येथे न्यायालयीन वाद प्रलंबित असल्याचे निवेदनात नमुद करण्यात आले आहे.



■ वासुंदे येथील भाऊसाहेब महाराज शिक्षण प्रसारक संस्थेतील बेकायदेशीर नोकर भरतीस स्थगिती देण्याच्या मागणीचे निवेदन सादर करण्यात आले.

### दमदाटी करून सह्या

१९ ऑगस्ट १९६९ मध्ये स्थापना झालेल्या या संस्थेच्या संस्थापक ११ संचालकांपैकी सदाशिव हरिभाऊ तनपुरे व भागुजी बाबुराव झावरे हे दोघे हयात आहेत. संस्थेची तालुक्यात ८ विद्यालये आहेत. ३१ मार्च २०१६ अखेर संस्थेचे कामकाज व्यवस्थित सुरू होते. कोणतेही वाद नव्हते. मार्च २०१६ नंतर सुजित झावरे यांनी सर्व संचालकांना शिविगाळ, दमदाटी करून संस्थेची कागदपत्रे ताब्यात घेतली. कोऱ्या प्रोसिडींगवर सर्वांच्या सहया घेतल्या. नंतर घरातील मंडळींना सभासद करून हवे तसे ठराव करून घेतल्याचा आरोप निवेदनात करण्यात आला आहे.

### प्रशासक नेमा

सुजित झावरे यांनी धर्मादाय आयुक्तांकडे बदल अर्ज दाखल केला. मात्र या अर्जास एप्रिल २०१६ ते सन २०१९ पर्यंत मान्यता मिळू शकली नाही. त्याबाबतचा वाद धर्मादाय आयुक्त पुणे यांच्यापुढे सुरू आहे. सध्या सहाय्यक धर्मादाय आयुक्त नगर यांच्याकडे दोन्ही संचालक मंडळांचे बदल अर्ज दाखल आहेत. सन २०१९ ते २०२२ या कालावधीसाठी कोणासही मान्यता देण्यात आलेली नाही. या प्रकरणाची तातडीने चौकशी करून संस्थेवर प्रशासक नेमण्यात यावा अशी मागणीही करण्यात आली आहे.

### आ. लंकेंचीही तक्रार

या वादासंदर्भात संचालकांनी आ. नीलेश लंके यांची भेट घेऊन शिक्षक बेकायदा शिक्षक भरतीबाबत माहीती दिल्यानंतर आ. लंके यांनी उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्यासह राज्याचे शिक्षण मंत्री, मुख्य शिक्षण सचिव यांचे पत्राद्वारे लक्ष वेधले आहे. यासंदर्भात विधीमंडळात लक्षवेधी मांडण्यासाठीही आ. लंके यांनी पत्र दिले आहे.

### न्यायालयाचा अवमान

शिक्षण संस्थेतील कोणताही बदल अर्ज अधिकृतपणे धर्मदाय आयुक्त पुणे यांनी मंजुर केलेला नाही. तरीही अध्यक्ष सुजित झावरे व सचिव सुदेश झावरे यांनी १३ शिक्षकांच्या जागांसाठी वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिध्द करून न्यायालयाचा तसेच शिक्षण विभागाचा अवमान केल्याचा आरोप निवेदनात करण्यात आला आहे.

## वडगांव दर्या पर्यटनस्थळासाठी ९ कोटींचा निधी - विश्वनाथ कोरडे

**पारनेर : प्रतिनिधी**

**राज्यातील भाविकांचे श्रध्दास्थान तसेच लवणस्तंभांमुळे जगभरातील पर्यटक तसेच अभ्यासकांना भुरळ घालणाऱ्या निसर्गरम्य वडगांव दर्या पर्यटनस्थळाच्या विकासासाठी ९ कोटी १४ लाख ४८ हजार रूपयांच्या निधीसाठी तत्वतः मंजुरी मिळाल्याची माहिती भाजपाच्या प्रदेश कार्यकारणीचे सदस्य विश्वनाथ कोरडे यांनी दिली.**

निसर्गरम्य तसेच भौगोलिक महत्व असलेल्या या परिसराचा विकास करण्यासाठी विश्वनाथ कोरडे यांनी पुढाकार घेऊन खा. डॉ. सुजय विखे, पालकमंत्री राधाकृष्ण विखे यांच्या माध्यमातून पुढाकार घेतला होता. वनमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्याकडे पाठपुरावा केल्यानंतर या निधीस तत्वतः मंजुरी मिळाल्याचे कोरडे म्हणाले. या निधी मिळविण्यासाठी उपवनसंरक्षक माने यांचे मोलाचे सहकार्य लाभल्याचेही कोरडे यांनी आवर्जुन नमुद केले.

वडगांव दर्या परिसराच्या भौगोलीक रचेनेचा विचार करून पर्यटकांच्या गरजा भागविण्यासाठी निधीची आवष्यकता होती. हा निधी मंजुर झाल्यानंतर छोटे मोठे उद्योग वाढीस लागून विविध वन औषधींच्या निर्मितीसही चालना मिळणार आहे. त्यासाठी गेल्या दिड वर्षांपासून या प्रस्तावासाठी कोरडे हे सातत्याने पाठपुरावा करीत होते. सुमारे तीन वर्षात मार्गी लागणाऱ्या या कामानंतर या परीसरात खऱ्या अर्थाने पर्यटनास चालना मिळणार आहे.



■ वडगांव दर्या पर्यटनस्थळाच्या विकासासाठी ९ कोटी १४ लाख ४८ हजार रूपयांच्या निधीसाठी तत्वतः मंजुरी देण्यात येत असल्याच्या आदेशाची प्रत मंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी विश्वनाथ कोरडे यांच्याकडे सुपूर्द केली.

### वन विभागाकडील पाठपुराव्यास यश

या परिसरातील जमीनीचा हक्क वन विभागाकडे येत असल्याने येणाऱ्या तांत्रीक अडचणींमुळे हा भाग अनेक दशकांपासून विकासापासून वंचित होता. वन विभागाकडे सातत्याने पाठपुरावा केल्यानंतर या परिसराच्या विकासाचा मार्ग मोकळा झाला आहे.

**विश्वनाथ कोरडे**
प्रदेश कार्यकारणी सदस्य, भाजपा

### काय आहे योजना ?

मंदिर परिसरातील दोन दऱ्यांना जोडणारा पुल हे या योजनेचे प्रमुख आकर्षण असणार असून पर्यटकांसाठी सर्व सुविधांसह अतिथिगृह, स्नान गृह, स्वयंपाकगृह, प्रसाधानगृहांसह या भागात वास्तव्यास असलेल्या माकडांच्या संवर्धन संरक्षणाच्या उपाययोजना करण्यात येणार आहेत.

## नागवडे दाम्पत्यांचा निर्णय पक्का ; राष्ट्रवादीत जाणार!

### ■ काँग्रेसच्या जिल्हाध्यक्षपदांचे राजीनामे ■ येत्या पंधरा दिवसात प्रवेश करणार

**श्रीगोंदा : प्रतिनिधी**





**उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी खंबीरपणे पाठीशी उभे राहण्याचा शब्द दिला आहे. त्यामुळे आपण राष्ट्रवादीत जाण्याचा निर्णय घेतला असून येत्या पंधरा दिवसांत प्रवेश करणार असल्याची घोषणा काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र नागवडे यांनी कार्यकर्त्यांच्या बैठकीत केली. दरम्यान, राजेंद्र नागवडे आणि अनुराधा नागवडे दोघांनीही जिल्हाध्यक्षपदांचे राजीनामे पक्षाकडे पाठविले आहेत.**

येथे आयोजित बैठकीत बोलताना राजेंद्र नागवडे म्हणाले, नागवडे कुटुंबाने दोनवेळा दुसऱ्यांना आमदार केले. आजही सामान्य माणूस नागवडे कुटुंबासोबत आहे. उमेदवारी मिळो अगर न मिळो कोणत्याही परिस्थितीत अनुराधा नागवडेंना विधानसभा निवडणुकीत उतरविण्याचा निर्णय यापूर्वीच घेतला आहे. काही दिवसांपूर्वी बाळासाहेब नाहाटा यांच्या पुढाकाराने उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याशी चर्चा झाली. तीत नागवडे कुटुंबाला सर्वोतोपरी पाठबळ देण्याचा शब्द अजित पवारांनी दिला आहे. त्यामुळे आपण उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश करण्याचा निर्णय घेतला आहे. येत्या पंधरा दिवसांत उपमुख्यमंत्री अजित पवार व नेतेमंडळींच्या उपस्थितीत राष्ट्रवादीत प्रवेश करणार आहोत.

राजेंद्र नागवडे पुढे म्हणाले, येत्या काळात महायुती सरकारच्या माध्यमातून तालुक्यातील विकासकामे मार्गी लावण्यासाठी सहकार्य करण्याचा शब्द अजित पवारांनी दिला आहे. महायुती सरकारच्या पाठबळावर श्रीगोंदेकरांना अभिमान वाटेल, अस काम करायचं आहे.

नागवडे कारखान्याचे उपाध्यक्ष बाबासाहेब भोस म्हणाले, नागवडे कुटुंबाने अनेकांना मोठे केले. आता कोणत्याही परिस्थितीत नागवडे कुटुंब स्वतः विधानसभा निवडणूक लढणार आहे. कार्यकर्त्यांनी त्यांना आमदार करण्यासाठी जीवाचे रान करावे.

तत्पूर्वी महेश तावरे, सतीश मखरे, निवास नाईक, शहाजी गायकवाड, प्रकाश बोरुडे, भीमराव नलगे, चांगदेव पाचपुते, रुपेश इथापे, सुभाष शिंदे आदींनी मत मांडले. जिजाराम खामकर, राकेश पाचपुते, जीवन शिपलकर, आदेश नागवडे, प्रमोद शिंदे, महेश जंगले आदी उपस्थित होते.

## मराठा आरक्षणासाठी १५ फेब्रुवारीला विशेष अधिवेशन

### ■ मागासवर्ग आयोगाचा अहवाल मांडणार ■ राज्य सरकारचा मोठा निर्णय

**मुंबई : प्रतिनिधी**




**मराठा आरक्षणासाठी मराठा समाजाकडून वेळोवेळी मोठ-मोठी आंदोलने उभारली गेली. अनेक मोर्चे निघाले. तरीदेखील या विषयावर आतापर्यंत ठोस तोडगा निघालेला नाही. त्याच पार्श्वभूमीवर आता मराठा आरक्षणाविषयी मोठी घडामोड घडताना दिसत आहे. राज्य सरकारने १५ फेब्रुवारी रोजी मराठा आरक्षणावर निर्णय घेण्यासाठी एका दिवसाचे विशेष अधिवेशन बोलावण्याचा निर्णय घेतला आहे. या अधिवेशनात मागासवर्ग आयोगाचा अहवाल मांडला जाणार असून नव्याने केलेल्या सर्वेक्षणाच्या आधारे कायदा बनवला जाण्याची शक्यता आहे. तसेच, आरक्षणाबाबतचे विधेयकही या अधिवेशनात मांडले जाण्याची शक्यता आहे.**

सध्या सर्वोच्च न्यायालयात मराठा समाजाला दिलेल्या आरक्षणाच्या निर्णयावर पुनर्विचार करण्यासाठी दाखल करण्यात आलेल्या क्युरेटिव्ह याचिकेवर सुनावणी सुरू आहे. तर, मराठा समाजाला सरसकट कुणबी प्रमाणपत्र देऊन ओबीसींच्या कोट्यातून आरक्षण देण्याची मागणी मराठा आंदोलक मनोज जरांगे-पाटील यांनी लावून धरली आहे. त्यासाठी त्यांनी अंतरवाली सराटी ते मुंबई असा महामोर्चाही काढला होता. त्यानंतर कुणबी नोंदी आढळलेल्या मराठा व्यक्तींच्या सगेसोयऱ्यांना कुणबी दाखले देण्याची तयारी राज्य सरकारने दर्शवली होती. तशी अधिसूचनाही प्रसिद्ध करण्यात आली आहे.

दरम्यान, जरांगे यांनी छेडलेल्या आंदोलनानंतर राज्य सरकारने मराठा आरक्षण देण्याचे आश्वासन दिले आहे. असे असतानाही येत्या १० फेब्रुवारीपासून जरांगे पुन्हा आमरण उपोषणाला बसणार आहेत. मराठा आरक्षणाचा कायदा पारित करावा आणि आरक्षण लागू उर्वरीत पान ३ वर

## शिरूरला शरद पवार समर्थकांचा निषेध !

### शरद पवार झिंदाबाद घोषणांनी परिसर दणाणला

**शिरूर : प्रतिनिधी**




**राष्ट्रवादी काँग्रेस हे पक्षनाव व घड्याळ चिन्ह, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या गटाला देण्याच्या निवडणूक आयोगाच्या निर्णयाचा आज येथे शरद पवार समर्थकांसह राष्ट्रवादी शरद पवार पक्षाच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी धिक्काराच्या घोषणांसह निषेध नोंदविला. या निषेधासाठी गावातून जाणाऱ्या पुणे-नगर रस्त्यावर जमलेल्या कार्यकर्त्यांनी शरद पवार झिंदाबाद चे नारे देत परिसर दणाणून सोडला.**

गावातून जाणाऱ्या पुणे-नगर रस्त्यावर शरद पवार समर्थक व राष्ट्रवादी काँग्रेसच्या (शरद पवार गट) कार्यकर्त्यांनी निषेधासाठी काही काळ निदर्शन केली. यावेळी निवडणूक आयोगाच्या निर्णयाचा घोषणा देत धिक्कार केला. या वेळी कार्यकर्त्यांनी सत्ताधारी हाय हायच्या गर्जनांनी परिसर दणाणून सोडला.

राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष मुजफ्फर कुरेशी, युवा नेते अमोल चव्हाण, राष्ट्रवादी युवकचे तालुकाध्यक्ष तुषार दसगुडे, शहराध्यक्ष अमित शिर्के, जिल्हा उपाध्यक्ष अर्षद शेख व नीलेश पवार, शिवसेना उर्वरीत पान ३ वर




## सत्ताधाऱ्यांना वचननाम्याचा विसर का पडला ?

### ■ परिवर्तन पॅनलचे दत्तात्रय भुजबळ यांचा सवाल ■ सैनिक बँक निवडणूक रणधुमाळी

**पारनेर : प्रतिनिधी**

**सैनिक बँकेतील सत्ताधाऱ्यांनी पाच वर्षापूर्वी झालेल्या पंचवार्षिक निवडणूकीत दिलेल्या वचननाम्याचा पाच वर्षाच्या कालावधीत विसर का पडला असा सवाल करीत आता आपल्याला या लबाड लांडग्यांच्या टोळीला परतवून लावावे लागेल असे आवाहन परिवर्तन पॅनलचे उमेदवार दत्तात्रय भुजबळ यांनी केले.**

निवडणूकीच्या पार्श्वभुमीवर बोलताना भुजबळ यांनी सांगितले की, बँकेच्या स्वमालकीच्या जागेमध्ये सर्व अद्यावत सुविधांसह बांधकाम करून स्तलांतर करणार व इमारत निधी जस जसा उपलब्ध होईल त्याप्रमाणे सर्व शाखांसाठी स्वमालकीच्या जागा खरेदी करून बांधकाम करणार, बँकेच्या शाखा विस्तारासाठी रिझर्व बँकेचे सर्व निकष पुर्ण करून किमान नगर, शिरूर, चंदननगर, सुपा व टाकळीढोकेश्वर येथे शाखा सुरू करणार, सभासद, ठेवीदारांचे ग्राहक मेळावे आयोजित करून अडी अडचणी समजुन घेऊन बँकेच्या सेवा व सुविधा वाढविणार सेच बँकिंग सेवा आपल्या दारी हा उपक्रम राबविणार, काटकसर करून मागील पाच वर्षात सबंधित संचालक मंडळाने केलेला अवाजवी व भरमसाठ खर्च पुर्णपणे बंद करणार, बँकेचा नफा वाढवून सभासदांना लाभांश देणार, एटीएम सुविधा देणार, नेट बँकींग सुविधा सुरू करणार, अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून ग्राहकांना बँकेच्या सेवा वाढविण्यावर भर देणार, बँकेचा एनपीए शुन्य टक्के करणार

पाच वर्षात बँकेच्या ठेवी ३०० कोटीपर्यंत वाढविणार, संचालकांच्या मुलांना बँकेत नोकरीस न घेता सभासदांचे पाल्य तसेच उच्चशिक्षित उमेदवारांची भरती करणार, सभासद पाल्यांना उच्च शिक्षणासाठी कर्ज उलपब्ध करून देणार, मेरीटमधील सभासदांच्या पाल्यांचा सन्मान चिन्ह देउन गौरव करणार आदी अश्वासने सत्ताधारी मंडळाने व पर्यायाने चेअरमन शिवाजी व्यवहारे यांनी दिली होती. या पैकी एकही आश्वासन पाळण्यात आले नसल्याचा आरोप भुजबळ यांनी केला आहे.

संचालकांची मुले नोकरीत घेणार नाही असे सांगणारांनी संचालकांची मुले कशी नोकरीत घेतली याचे उत्तर सभासदांना द्यावे असे आव्हानही भुजबळ यांनी दिले आहे.







# टेकझोन

## ॲमेझॉन करणार फूड डिलीव्हरी


स्विगी, झोमॅटो आणि उबेर इट्स या फूड डिलीव्हरी कंपन्यांच्या शर्यतीत आता ॲमेझॉनही उतरली आहे. किरकोळ व ई-विक्री क्षेत्रातील आघाडीची कंपनी ॲमेझॉन आता फूड डिलीव्हरी क्षेत्रात एन्ट्री करणार आहे. भारतात ऑनलाइन फूड सर्व्हिसचा व्यापार वाढत आहे. ग्राहकांकडून मोठ्या प्रमाणात या ॲप्सचा वापर केला जातो. एका अहवालानुसार ऑनलाइन जेवण ऑर्डर करणाऱ्यांच्या संख्येत १७६ टक्के वाढ झाली आहे. त्यामुळं ॲमेझॉनही या क्षेत्रात उतरली आहे. ॲमेझॉन उद्योजक नारायण मूर्ती यांच्या कॅटामारन कंपनीसोबत भागीदारी करणार असल्याचं बोललं जात आहे. दुसरीकडे ॲमेझॉन उबेर इट्स खरेदी करणार असल्याची चर्चा आहे. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, ॲमेझॉननं या नवीन व्यवसायासाठी कर्मचाऱ्यांची भरती करण्यास सुरुवात केली आहे. सप्टेंबर महिना हा सण- उत्सवाचा असतो. हेच लक्षात घेऊन ॲमेझॉननं नव्या व्यवसायाचा श्रीगणेशा करण्यासाठी सप्टेंबर महिना निवडला आहे.




# truecaller किती सुरक्षित ?

**अनोळखी क्रमांकावरून आलेला कॉल... त्यातून तो कामाचा असेल तर ठीक ... अन्यथा मनस्तापाशिवाय हाती काहीच लागत नाही. त्यातही हल्ली कॉल सेंटर आणि टेलिमार्केटिंगच्या कॉल्सचा सुळसुळाटच झाला आहे... या सर्व अजब परिस्थितीतून मार्ग काढण्यासाठी आपण ट्रू कॉलर नामक ॲपचा पर्याय आजमावतो आणि निर्धास्त होतो. मात्र, एका बातमीने ट्रू कॉलर वापरणाऱ्यांच्या पोटात गोळा आणला आहे. ट्रू कॉलरवर ग्राहकांनी दिलेली सर्व माहिती हॅक झाल्याची ही बातमी होती. या पार्श्वभूमीवर हा नक्की प्रकार काय आहे, याचा घेतलेला वेध...**


कोणताही अनोळखी मोबाइल वा दूरध्वनी क्रमांक शोधायचा असल्यास आपण सगळेच संबंधित क्रमांकावरून नाव शोधणारे ॲप वापरतो, ते म्हणजे ट्रू कॉलर. ट्रू कॉलरवर एखादा मोबाइल क्रमांक शोधला असता, तो मोबाइल किंवा लँडलाइन क्रमांक कोणत्या कंपनीचा आहे, तसेच तो क्रमांक साधारण कोणाचा आहे हे समजते. ट्रू कॉलरचे ॲपही आहे आणि वेबसाइटही. संबंधित क्रमांक वेबसाइटवरूनही शोधता येऊ शकतो.



## ट्रू कॉलर नक्की काय काम करते ?

अनोळखी क्रमांक शोधून त्या क्रमांकाची साधारण माहिती मिळवणे, यासाठी ट्रू कॉलर वापरले जाते. त्यासाठी आधी ट्रू कॉलरच्या मदतीने शोध घेऊ इच्छिणाऱ्या युजरला सर्वप्रथम या ॲपवर स्वतःचे रजिस्ट्रेशन करावे लागते. त्यात नाव, क्रमांक आणि ई-मेल आयडी देणे गरजेचे असते. त्याशिवाय आपण आपल्या गावाचे नाव, काय काम करतो, कुठे काम करतो, इत्यादी स्वतःबद्दलची पर्यायी माहिती टाकू शकतो. तसेच इतर साईट्स प्रमाणे स्वतःचा फोटोही टाकू शकतो. पण नक्की ट्रू कॉलरवर क्रमांक शोधला की त्या क्रमांकाची माहिती येते कुठून, हा प्रश्न अनेक जणांना पडलेला असतो. दोन उत्तरे आहेत. एक, जे युजर स्वतःच्या क्रमांकाची नोंदणी करतात त्यांचे नाव, क्रमांक आणि ई-मेल आयडी ट्रू कॉलरकडे साठवले जातात आणि जेव्हा कधी कोणी तो क्रमांक सर्च करेल तेव्हा नोंदणी केलेले नाव दिसते, तसेच युजरने आधी पुरवलेली अन्य माहिती उपलब्ध होते. असे अनेक लोक आहेत ज्यांनी कधीच ट्रू कॉलर वापरले नाही किंवा त्यावर नोंदणी केलेली नाही. तरीही त्यांचे नाव व क्रमांक ट्रू कॉलरकडे असतात. त्याचे कारण असे की ज्या लोकांनी ट्रू कॉलरवर नोंदणी केलेली आहे, त्यांच्या वैयक्तिक माहितीबरोबरच ट्रू कॉलरने त्या युजरच्या मोबाइलमधील सर्व कॉन्टॅक्टसुद्धा साठवून घेतलेले असतात. या गोष्टीची युजरला माहितीच नसते. याच कारणामुळे अनेकदा ट्रू कॉलरवर काही क्रमांक अगदी घरगुती नावांनी किंवा विचित्र नावांनी आलेले दिसतात, कारण ट्रू कॉलर वापरणाऱ्या कोणत्या तरी युजरने तो क्रमांक त्या विशिष्ट नावाने सेव्ह केलेला असतो.

## काय उपाययोजना करता येतील ?



- ट्रू कॉलरवर अगदी गरज असेल तरच नोंदणी करावी. केल्यास अगदी थोडक्यात नाव टाकावे. पूर्ण नाव टाकू नये.
- ई-मेल आयडी, फोटो, नोकरी, पत्ता आणि इतर काही माहिती टाकणे कटाक्षाने टाळावे.
- कधीच ट्रू कॉलर वापरले नसल्यास, एकदा ट्रू कॉलरवर आपला क्रमांक टाकून सर्च करून बघावे.
- जर काही विचित्र किंवा चुकीचे नाव आल्यास नोंदणी न करताही ते नाव एडिट करता येण्याची सुविधा उपलब्ध आहे. तिचा वापर करावा.

## डेटा सुरक्षित का नाही ?

ट्रू कॉलरवर अनेक तज्ज्ञांनी ताशेरे ओढले आहेत आणि ट्रू कॉलर वादात सापडतो आहे. ट्रू कॉलरवरील लोकांचा अफाट डेटा विकला जातो आहे. ट्रू कॉलरच्या जगभरातील वापरकर्त्यांपैकी ७० टक्के भारतीय आहेत. जवळपास १४ कोटींपेक्षा जास्त लोकांची माहिती असलेला डेटा अगदी नाममात्र पैशात विकला जातो आहे. डार्क वेबमध्ये या डेटाला प्रचंड मागणी असून, ट्रू कॉलरने देखील हे मान्य केले आहे. परंतु, आपल्या स्पष्टीकरणात ट्रू कॉलरने हा डेटा ट्रू कॉलरने विकलेला नसून, ट्रू कॉलरच्या काही वापरकर्त्यांनीच विकला आहे, असे म्हटले आहे. त्यामुळे ही डेटाविक्री अद्यापही सुरूच आहे. ट्रू कॉलरमध्ये जे प्रीमियम मेंबर युजर आहेत, त्यांना या अकाउंटसाठी काही रक्कम भरावी लागत असली तरी त्याचा एक फायदा आहे. एरवी तुम्ही क्रमांकावरून नाव फुकट शोधू शकता, पण जर तुम्हाला नावावरून क्रमांक शोधायचा असेल तर? पैसे भरून प्रीमियम मेंबर झाल्यावर ट्रू कॉलरवर आपण कोणतेही नाव टाकून क्रमांक मिळवू शकतो. काही भामट्यांनी प्रीमियम युजर बनत, सर्व नावे आणि क्रमांक मिळवले आहेत. यात केवळ नाव व क्रमांकच नाही तर ई-मेल आयडी, नोकरीचे ठिकाण, पत्ता आणि फोटो ही माहितीसुद्धा मिळवता येऊ शकते. या प्रचंड माहितीचा खूप मोठ्या प्रमाणात दुरुपयोग होऊ शकतो. आर्थिक किंवा बँकिंग व्यवहारात या माहितीचा दुरुपयोग केला जाऊ शकतो.

## चांगला उपयोग कसा केला जातो ?

अनोळखी क्रमांक शोधणे, ब्लँक कॉल किंवा धमकीचे फोन आले, कोणी त्रास देत असेल तर ते क्रमांक शोधण्याचे एक प्रभावी माध्यम म्हणून ट्रू कॉलर उत्तम आहे. तसेच अनेकवेळा एखाद्या क्रमांकाची विश्वासार्हतासुद्धा यावरून ठरवली जाते. जर एखाद्या व्यावसायिकाचा क्रमांक ट्रू कॉलरवर त्याच नावाने असेल, तसेच त्यासोबत फोटो, ई-मेल आणि इतर संबंधित माहिती असेल, तर त्याच्याविषयी विश्वास निर्माण होतो. ट्रू कॉलरने यूपीआयद्वारे पैसे पाठवण्याची सुविधासुद्धा भारतीय युजर्सना दिली आहे. ट्रू कॉलरमध्ये प्रीमियम युजर असा एक प्रकार आहे, ज्यात महिन्याला काही रक्कम भरावी लागते. ज्यामुळे तो युजर प्रीमियम युजर आहे, हे इतर लोकांना समजते. तसेच एक गोल्ड युजर प्रकार आहे, ज्यामुळे समोरच्या व्यक्तीचे नाव सोनेरी अक्षरात लोकांना दिसते. हे केवळ एक दिखाव्याचा प्रकार आहे, त्यासाठी वर्षाकाठी ६ हजार रुपये मोजावे लागतात.

## दुरुपयोग कसा केला जातो ?

अनेकवेळा काही भामटे लोक किंवा गैरव्यवहार करणारे लोक नोंदणी करताना खऱ्या नावाचा वापर करत नाहीत. जाणीवपूर्वक चुकीचे किंवा खोटे नाव वापरले जाते, जेणेकरून कोणी शोध घेतलाच तर आपली खरी ओळख समोर येऊ नये. याची काही उदाहरणे अशी...

- आपण पोलिस आहोत अशी बतावणी करण्यासाठी ट्रू कॉलरवर पोलीस मुख्यालय अधिकारी या नावाने नोंदणी करून लोकांना गंडा घालणारे काही भामटे आहेत. हे भामटे अशा लोकांना फोन करतात, ज्यांच्या व्यवहारात काही ना काही काळेबेरे आहे. आपण पोलिस असल्याचे सांगत त्यांच्याकडून पैसे मागितले जातात.
- अशाच पद्धतीने बँक अधिकारी, वकील, डॉक्टर इत्यादी अनेक नावाने नोंदणी करून लोकांना फोन केले जातात. ट्रू कॉलरवर तत्सम खोटे नाव आल्यामुळे समोरचा माणूस विश्वास ठेवतो आणि फसतो.
- मॅट्रिमोनिअल साईट्सवर असेच काही भामटे खोट्या नावाने वावरतात आणि ट्रू कॉलरवरही त्याच खोट्या नावाने नोंदणी करतात. याप्रकारे अनेक विवाहेच्छुकांची फसवणूक झाली आहे.




## एनीडेस्कद्वारे मोबाइल हॅकिंग

आयुषी आणि तिच्या मैत्रिणीने मणिकर्णिका चित्रपट पहायला जाण्याचा बेत आखला. आयुषीने त्यासाठी बुक मायशो ॲप वापरून दोन तिकिटे बुक केली आणि पेटीएम वॉलेटवरून पेमेंट केले. पण काय गडबड झाली ते कळले नाही, तिकिटे बुक झाली नाहीत. मात्र वॉलेटमधून पैसे डेबिट झाले. आयुषी अस्वस्थ झाली. तिने बुकमायशोच्या कम्प्लेंटसाठीचा मोबाइल नंबर गुगलवरून शोधून काढला आणि डायल केला. सगळी घटना सविस्तरपणे फोनवर बोलणाऱ्या व्यक्तीला आयुषीने सांगितली. त्याने तिला एनीडेस्क नावाचे ॲप इन्स्टॉल करण्यास सांगितले. ॲप इन्स्टॉल केल्यानंतर एक नऊ आकडी ओटीपी नंबर येईल तो आयुषीने याच मोबाइल नंबरवर कळवावा, असेही त्याने सांगितले. त्याप्रमाणे आयुषीने एनीडेस्क इन्स्टॉल करून आलेला ओटीपी त्या व्यक्तीला कळवला. त्यानंतर तिच्या मोबाइलवर ग्रँट परमिशन? एस/नो असा मेसेज आला. त्या मेसेजला उत्तर म्हणून तिने एस हा पर्याय निवडला. पाचच मिनिटांत तिच्या सॅलरी अकाऊंटमधून चाळीस हजार रुपये तिच्याच फोनवरील पेटीएम हे यूपीआय ॲप वापरून काढून घेण्यात आले...

एनीडेस्क हे रिमोट डेस्कटॉप ॲक्सेस करण्यासाठी असलेले ॲप



आहे. म्हणजे समजा तुम्ही ऑफिसला आहात आणि तुम्हाला घरच्या कम्प्युटरवरील एखादी फाइल हवी आहे तर या ॲपद्वारे ती फाइल तुम्ही मिळवू शकता. तसे हे ॲप फार उपयोगी आहे. पण हॅकर्स याचा दुरुपयोग करतात आणि तुमच्या मोबाइलचा पूर्ण ताबा मिळवण्यासाठी याचा वापर करतात. एनीडेस्क इन्स्टॉल करून आलेला ओटीपी तुम्ही कोणाला दिला आणि त्यानंतर आलेला ॲक्सेस परमिशन मागण्यासाठीचा मेसेज स्वीकारला तर त्या व्यक्तीला तुमचा फोन पूर्णपणे ॲक्सेस करता येईल म्हणजे तुमच्या फोनचा पूर्णपणे ताबा घेता येईल. त्याद्वारे ती व्यक्ती म्हणजे हॅकर फोनवरील इतर ॲप्सने साठवलेल्या डेटाची चोरी करते. या घटनेत आयुषीने गुगलवरून शोधलेला बुक माय शोचा कम्प्लेंट मोबाइल नंबर फेक होता. तो तिने खरा समजून बोलणाऱ्या व्यक्तीवर विश्वास



ठेवून त्याच्याशी ओटीपी शेअर केला. त्यामुळे तिचा मोबाइल हॅक झाला. एनीडेस्कद्वारे त्या हॅकरने पेटीएममध्ये स्टोअर असलेले डेबिटकार्ड डिटेल्स वापरून पेटीएममार्फतच ट्रान्जॅक्शन घडवून आणले आणि आयुषीच्या सॅलरी अकाउंट मधून पैसे डेबिट झाले.

### वापरकर्त्यांनी हे लक्षात ठेवावे...

- इंटरनेटवरील सर्वच टोल फ्री किंवा मोबाइल नंबर खरे असतातच असे नाही. ते हॅकर्सने तुमची दिशाभूल करण्यासाठी टाकलेले असू शकतात.
- कोणाही व्यक्तीसोबत कुठलाही ओटीपी किंवा पिन शेअर करू नये.
- आपले कार्ड डिटेल्स कुठेही सेव्ह करून ठेवू नये. अगदी खात्रीच्या यूपीआयमध्येही नाही.
- ज्या बँक अकाऊंटच्या द्वारे ऑनलाइन ट्रान्झेक्शन करत असाल त्यात गरजेपुरतेच पैसे ठेवावे.
- कमीत कमी ॲप्स आपल्या मोबाइलमध्ये वापरावे.
- भारतीय रिझर्व्ह बँकेने एनीडेस्क ॲप वापरू नका, अशी ग्राहकांना सूचना दिली आहे.





प्रियांका एक मध्यमवर्गीय मुलगी उच्च शिक्षणासाठी मुंबईत वनरूम फ्लॅटमध्ये राहणारी. कॉलेज, क्लासनंतर उरलेल्या वेळात विरंगुळा म्हणून तिला चॅटिंगचा नाद लागला. चॅटिंग करता करता राहुलशी तिची ऑनलाइन भेट, मैत्री झाली. म्हणजे त्याने तरी त्याचे नाव राहुल असे सांगितले. पुढे पुढे त्याच्याशी चॅटिंगचे तिला एवढे व्यसन जडले की ती आपला लॅपटॉप आणि इंटरनेट कनेक्शन कायम ऑन मोडवर ठेवू लागली. तिला जेव्हा वेळ मिळेल, तेव्हा ती राहुलशी चॅटींग करत असे. एक दिवस राहुलने तिला चॅट विंडोमध्ये एक लिंक पाठवून त्याचा पर्सनल ऑनलाइन अल्बम बघण्यास सांगितले. अल्बममधील राहुलचे फोटो बघून ती अधिकच प्रभावित झाली. पुढच्या चॅटिंगच्या वेळेस तिने राहुलला समक्ष भेटण्याची इच्छा प्रदर्शित केली. आपण बाहेरगावी जात आहोत, असे सांगून राहुलने तिला टाळले. त्या दिवशीपासून तिच्या एक गोष्ट लक्षात आली की तिचा लॅपटॉप प्रोसेसिंगसाठी जास्त वेळ घेत आहे. राहुलशी तिचे चॅटिंग चालूच होते, पण समक्ष भेटण्याची इच्छा जाहीर केल्यास तो काही करून टाळत होता. बऱ्याचदा वेबकॅम ऑन करून ती त्याच्याशी चॅट करत असे. तो मात्र आपल्या लॅपटॉपचा वेबकॅम खराब झाला आहे, असे सांगत असे. असे पाच सहा महिने लोटले. प्रियांकाचा कोर्सही पूर्ण झाला. तिने नोकरीसाठी अप्लाय करायला सुरुवात केली. एका कंपनीकडून तिला नोकरीसाठी इंटरव्ह्यू कॉल आला. पूर्ण तयारीनिशी ती



इंटरव्ह्यूला हजर झाली. इंटरव्ह्यू घेणारा मध्यमवयीन व्यक्ती तिच्याकडे विचित्र नजरेने पाहत होता. इंटरव्ह्यू अपेक्षेपेक्षा छान झाला. बहुतेक सर्व प्रश्नांची उत्तरं प्रियांकाने बरोबर दिली. आता ही नोकरी आपल्यालाच मिळणार, अशी तिला खात्री वाटू लागली. चार दिवस तिने वाट पाहिली. पाचव्या दिवशी तिने त्या कंपनीला फोन करून चौकशी केली. इंटरव्ह्यू घेणाऱ्या व्यक्तीने तिला समक्ष भेटण्यास बोलावले. त्याने तिला जे सांगितले, त्यामुळे तिला जबरदस्त धक्का बसला. कशीतरी ती आपल्या फ्लॅटवर आली. त्या माणसाचे शब्द वारंवार तिच्या डोक्यात घणाघात करत होते. तू हुशार, स्मार्ट आहेस, पण पोर्न साइटस्‌वर वारंवार दिसणाऱ्या मुलीला आम्ही नोकरी देऊ शकत नाही...

एक एक संदर्भ तिच्या लक्षात येऊ लागला. राहुलचे समक्ष भेटण्यास टाळाटाळ करणे, तिला पाठवलेले लिंक क्लिक करताच लॅपटॉपचे प्रोसेसिंग स्लो होणे... एक एक धागा जुळत गेला. विचार करून मेंदूचे तुकडे पडायला आले. गुगलवर सर्च केल्यावर तिच्या विचारांना पुष्टी मिळाली. तिने गुगलवर सर्च करून सायबर सिक्युरिटी कन्सल्टंटचा नंबर मिळवला आणि त्याला भेटायचे ठरवले. दुसऱ्या दिवशी ती सायबर सिक्युरिटी कन्सल्टंटच्या ऑफिसमध्ये आपल्या लॅपटॉपसोबत हजर झाली. त्याने सुमारे अर्धा तास लॅपटॉप आणि चॅटस्‌चे डिटेल्स बघून, आपल्या जवळील अँटी व्हायरस, अँटी स्पायवेअर आणि इतर



सॉफ्टवेअर वापरून, काही ठोकताळे मांडून तिला सांगितले की राहुलने तिला चॅटिंग करताना जी लिंक पाठवली होती ती त्याच्या ऑनलाइन अल्बमची तर होतीच पण त्याचबरोबर ट्रोजन लिंकही होती. ट्रोजन हा व्हायरससारखाच छुपा प्रोग्रॅम असून, जास्त पॉवरफुल असतो म्हणजे तो तुमच्या लॅपटॉपचा वेबकॅमसुद्धा ऑटोमॅटिकली ऑन करू शकतो. ट्रोजनचं डिटेक्शन अँटीव्हायरस लगेच करतो. पण प्रियांकाच्या लॅपटॉपमध्ये अँटीव्हायरस, अँटी स्पायवेअर काहीही नव्हते. प्रियांकाच्या एक एक गोष्ट लक्षात येऊ लागली वनरूम फ्लॅट त्यात आपला लॅपटॉप इंटरनेटसह कायम ऑन असणे, राहुलशी वेबकॅम ऑन करून मारलेल्या गप्पा... तिच्या हाता पायातले त्राण गेल्यासारखे झाले. तिचे फोटो आणि तिच्या ॲक्टिव्हिटीज रेकॉर्ड करून त्यांच्याशी फोटो एडिटर वापरून छेडछाड करून त्याने तिचे पोर्न फोटोज् आणि व्हिडिओज् बनवून तसल्या साइटस्‌वर अपलोड केले होते. हे फारच धक्कादायक होते. शहर पोलिस सायबर सेलला तिने रीतसर कम्प्लेंट नोंदवली. आज या घटनेला दोन वर्षे झाली पण राहुल अजूनही पोलिसांना सापडलेला नाही. कारण सायबर क्राईम करणारे स्वतःचा ट्रेस लागू न देण्याची खबरदारी जरूर घेतात. तेव्हा मित्रमैत्रिणींनो सावध, सतर्क रहा. अनोळखी लोकांशी कधीही चॅट करू नका. कुठलीही लिंक ओपन करु नका. चांगले इंटरनेट सेक्युरीटी अँटीव्हायरस आपल्या संगणकावर, लॅपटॉप वर जरूर ठेवा.

## शॉर्ट न्यूज

### वेश्या व्यवसायावर पोलिसांचा छापा

■ **संगमनेर** : तालुक्यातील पोखरी बाळेश्वर शिवारात एका महिलेकडून मुलींना पैशाचे आमिष दाखवून त्यांच्याकडून देहव्यापार करून घेणाऱ्या महिलेच्या विरोधात घारगाव पोलिसांनी गुन्हा दाखल केला. पोलिसांनी यातून चार महिलांची सुटका केली. पोलिसांचा छापा पडला त्या वेळी पाच पुरूष तेथे आढळून आले; मात्र एकाने पोलिसांच्या हातावर तुरी पसार झाला. पोलिसांनी या ठिकाणी बनावट ग्राहक पाठवून खात्री केली.याप्रकरणी पोखरी बाळेश्वर येथील आरोपी ४८ वर्षीय महिला, सोमनाथ यादव सरोदे, दीपक उत्तम फटांगरे यांच्याविरोधात गुन्हा दाखल केला आहे.

### दुचाकी चोरणारा तरुण जेरबंद

■ **नगर** : येथील सैन्यदल परिसरात चोरीची दुचाकी विक्री करण्यासाठी आलेल्या तरूणाला दक्षिण कमान मिलेट्री इंटेलिजेन्स, पुणे व कोतवाली पोलीस यांनी संयुक्त कारवाई करून जेरबंद केले. दिलीप दत्तात्रय शिंदे असे त्याचे नाव आहे. त्याच्याकडून दुचाकी हस्तगत करण्यात आली आहे. शिंदे याने सदरची दुचाकी बुधवारी (दि. ७) येथील क्लोरा ब्रुस मैदानावर झालेल्या ओबीसी एल्गार मेळाव्याच्या पार्किंगमधून चोरी केल्याची कबूली दिली आहे.

### वाकचौरेंना सेनेकडून उमेदवारी निश्चित

■ **शिर्डी** : लोकसभा मतदार संघासाठी उमेदवारांची शिवसेना उद्धव ठाकरे गटाकडून माजी खासदार भाऊसाहेब वाकचौरे यांची निवड निश्चित झाली असून केवळ औपचारिक घोषणा करणे बाकी आहे, अशी माहिती समजते. मुंबई येथे एका महत्त्वपूर्ण मीटिंगमध्ये मा. खा. भाऊसाहेब वाकचौरे यांचे नावावर शिक्कामोर्तब झाल् याचे विश्वसनीय वृत्त आहे. या महत्त्वपूर्ण बैठकीला शिवसेना उपनेते विश्वास नेरुळकर, माजी खासदार भाऊसाहेब वाकचौरे, जिल्हा प्रमुख रावसाहेब खेवरे, उपजिल्हाप्रमुख सचिन बडधे, तालुकाप्रमुख राधाकिसन बोरकर, सोमनाथ गोरे आदी उपस्थित होते.

### रस्ता डांबरीकरणाच्या कामाचा प्रारंभ

■ **केडगाव** : काही वर्षापासून रखडलेल्या व नागरिकांचा जिव्हाळ्याचा प्रश्न बनलेल्या केडगाव येथील प्रभाग १६ मधील शाहूनगर परिसरातील रस्ता डांबरीकरणाच्या कामाचे प्रारंभ करण्यात आले. माजी नगरसेवक सुनिल (मामा) कोतकर व संदीपदादा कोतकर युवा मंचच्या पाठपुराव्याने खासदार डॉ. सुजय विखे पाटील यांच्या निधीतून या रस्त्याचे काम मार्गी लावण्यात आले आहे. रस्ता डांबरीकरण कामाचा शुभारंभ उद्योजक सचिन (आबा) कोतकर यांच्या हस्ते करण्यात आला.

### पुणतांबा परिसरात विजेचा खेळखंडोबा

■ **पुणतांबा** : गाव व परिसरात विजेचा खेळखंडोबा झाला असून, वीजपुरवठ्यात येत्या ७ दिवसांत सुधारणा झाली नाही तर १५ फेब्रुवारीला महावितरणाच्या राहाता येथील कार्यालयात शेतकरी व ग्रामस्थांच्यावतीने ठिय्या आंदोलन करण्यात येईल, असा इशारा मनसेचे तालुकाप्रमुख गणेश जाधव यांनी लेखी निवेदनाद्वारे दिला आहे. परिसरात विजेच्या पुरवठ्यात अनियमितता वाढली आहे. विजेच्या लपंडावामुळे शेतकरी वर्ग त्रस्त झाला आहे. त्यातच विजेचा दाब कमी जास्त असल्यामुळे अनेक शेतकऱ्यांचे विद्युत पंप जळण्याचे प्रकार वाढले आहे.

# जगण्याने छळले होते... मृत्यूनंतरही सुटका नाही!

**■ तालुक्यात अनेक स्मशानभूमींची अवस्था मरणासन्न**
**■ सोईसुविधांअभावी आता मरणही झाले वेदनादायक**

शिरुर : सतीश डोंगरे

**जिवंत असेपर्यंत अनेक मूलभूत समस्यांना तोंड द्यायचे आणि मरणानंतरही या समस्यांतून सुटका नसल्याचे विदारक चित्र शिरूर तालुक्यातील विविध गावच्या स्मशानभूमीच्या दुरावस्थेवरून दिसून येत आहे. अनेक गावांमधील स्मशानभूमीत कोणत्याच सुविधा नसल्याने मरणयातना कायम आहेत. जगण्याने छळले होते, मरणानंतरही सुटका नाही असेच वास्तव या स्मशानभूमीसंदर्भात आहे.**



तालुक्यातील बोऱ्हाडेमळा, नवलेमळा, लंघेवाडी यांसह आणखी काही गावात तर स्मशानभूमीच नसल्याचे भयानक वास्तव पारनेर दर्शनने केलेल्या पाहणीत समोर आले आहे. अशावेळी नागरीकांना दूरच्या स्मशानभूमीत पायपीट करीत जावे लागते तर काहीजण स्वतः च्या शेतातच अंत्यविधी आटोपतात. बोऱ्हाडेमळा येथील स्मशानभूमीच्या शेडसाठी व सुशोभीकरणासाठी आता जिल्हा नियोजन समिती फंडातून १५ लाख रुपयांचा निधी मंजूर झाल्याची माहिती शिरूर ग्रामीणचे उपसरपंच बाबाजी वर्पे यांनी दिली. तर लंघेवाडी येथील स्मशानभूमीचा महत्वाचा प्रश्न मार्गी लागण्यासाठी स्थानिक ग्रामस्थ प्रविण बबुशा लंघे यांनी स्वतःची जागा दिली आहे.गावोगावच्या स्मशानभूमीत किमान सुविधा मिळाव्यात याकरिता ग्रामस्थ सतत झगडताना दिसत आहेत.

अनेक स्मशानभूमीत गाजर गवत माजले आहे. अंत्यविधीसाठी काट्याकुट्यात आणि दगडधोंड्यात बसावे लागते. रस्त्यावर असणारी गावे सोडली तर बहुतेक ठिकाणी वेटिंगशेड, रस्ता, पाणी, दिवाबत्ती यांसारख्या सुविधाही नाहीत. साधी मृतांची नोंद घेण्यासाठी अनेक ग्रामपंचायतींमध्ये मृतांच्या नातेवाईकांना हेलपाटे मारावे लागत असल्याचे वास्तव आहे. काही गावांतील स्मशानभूमी तर दारू आणि पत्ते खेळणाऱ्यांचे अड्डे बनले आहेत. अनेक गावात पावसाळ्यात तर परिस्थिती फारच बिकट असते. वेटिंग शेड नसल्यामुळे बसता ही येत नाही, खूप गैरसोय होते उभे राहूनच अंत्यविधी उरकावा लागतो. काही लोक शौचालयासाठी स्मशानभूमीचा वापर करतात. त्यामुळे अंत्यविधीवेळी नाकाला रुमाल लावूनच थांबावे लागते कोणत्याच प्रकारची स्वच्छता या परिसरात होत नाही. आजही लोक बऱ्याच ठिकाणी स्मशानभूमीत शौचालयाला जातात हे वास्तव आहे.

गावोगावी स्मशानभूमीला संरक्षक भिंत नसल्याने मोकाट जनावरांचा मुक्त वावर असतो. काही गावात स्मशानभूमीला पत्र्याचे शेड आहे अंत्यविधी करताना पावसाळ्यात या पत्र्यातून दहनशेड मध्ये पाणी गळत असते, त्यामुळे अंत्यविधी करतांना अडचणी येत असल्याचे ग्रामस्थांनी सांगितले. काही ठिकाणी स्मशानभूमी विकसित करतांना लावण्यात आलेले लोखंडी गेट चक्क चोरीला गेली आहेत.

एकूणच तालुक्यातील विविध गावांतील नागरीकांना आज ही अनेक गैरसोयीचा सामना करत अंत्यविधी उरकावा लागत असल्यामुळे आणि नागरिकांना जिवंतपणीच अनेक समस्या सहन कराव्या लागत असताना आता मरणानंतरही यातना सहन कराव्या लागत असल्याचे विदारक चित्र याचि देही याचि डोळा बघायला मिळत असल्याने सर्वसामान्य नागरिकांमध्ये राजवटीबद्दल तीव्र संताप व्यक्त होताना दिसत आहे.

## वाचकांच्या लेखणीतून

### प्रा. ज्ञानेश्वर कवाद यांच्या वक्तृत्वकलेच्या निमित्ताने

प्रा. ज्ञानेश्वर कवाद यांचे कार्य प्रेरणादायी हे ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांचे गौरवोद्गार वाचले (पारनेर दर्शन, ७ फेब्रुवारी, बुधवार).



प्रा. ज्ञानेश्वर कवाद यांचे वक्ता दशसहस्त्रेषु म्हणावे असे वक्तृत्व आहे. प्रा. कवाद हे तरूण आणि तडफदार व्यक्तीमत्व आहे. छत्रपती शिवाजी महाराज आणि तत्कालीन इतिहास हा त्यांच्या वक्तृत्वाचा मुख्य विषय आहे. छ. शिवाजी महाराज म्हणजे समस्त महाराष्ट्राचेच नव्हे किंवा भारताचेच नव्हे; तर समस्त जगाचेच अभ्यसनीय आणि वंदनीय स्थान आहे. महाराज हयात असतानाच त्यांच्या खाजगी आणि पारिवारिक गोष्टींवर परकीयांची, विशेषतः पाश्चात्त्य राष्ट्रे आणि त्यांचे इतिहासकार यांची बारीक नजर असे. बंगाली इतिहासकार सुरेंद्रनाथ सेन यांनी फॉरेन बायोग्राफीज ऑफ शिवाजी (परकीयांनी लिहिलेली शिवचरित्रे) हा इंग्रजी ग्रंथ जरूर वाचून पहावा. परकीय लोक आपल्या महाराजांच्या इतिहासाचा अभ्यास करतात. मग आपल्या स्वकीयांनी, खास करून मराठी भाषिक लोकांनी महाराजांचा इतिहास ऐकला, वाचला आणि अभ्यासलाही पाहिजे. ग्रँट डफ या इंग्रज इतिहासकाराचा मराठ्यांचा इतिहास, बाळशास्त्री हरदास यांच्या शिवचरित्र व्याख्यानांना चतुष्खंडात्मक ग्रंथरूप मिळाले आहे. सामान्य वाचकांसाठी शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे यांनी लिहिलेले रसाळ शिवचरित्र आहे. आणखी कितीतरी ग्रंथ सुचविता येतील. झालेच तर शिवकालीन शाहीर अज्ञानदास, एवढेच नव्हे तर म. फुल्यांनी लिहिलेला शिवाजी महाराजांचा पोवाडा आहे. आणखी कितीतरी...पण जनसामान्यांना प्रा. ज्ञानेश्वर कवाद यांच्यासारख्या शिवव्याख्यात्यांकडून शिवचरित्र ऐकायला मिळत आहे. हेही काही कमी नाही! माणसाच्या अंगी एखादी तरी कला असावी, असे संत तुकडोजी महाराज सांगत असत. प्रा. ज्ञानेश्वर कवाद यांच्याकडे वक्तृत्वकला आहे. जनसामान्यांनी आपली श्रवणकलाही जोपासत राहावी.

तमाम उम्र इसी इक ख़याल में गुज़री।
कि ज़िंदगी के फराईज़ से ज़िंदगी कम है।।

उमर अंसारी म्हणतात, जीवनभर एकच विचार केला. निष्कर्ष काय निघाला? जीवनातील कर्तव्यांपुढे हयात तोकडी पडते!

म्हणून प्रा. ज्ञानेश्वर कवाद यांनी शिवचरित्रावर बोलत राहावे. जनसामान्यांनी ते ऐकत राहावे.

**नाना ढवळे**
८२८६९१३२२३
निघोज, ता. पारनेर,
जि. अहमदनगर.

# चला जुन्नरला...बिबट्या पाहायला !

**■ सफारीच्या निर्णयाचे जुन्नरवासीयांकडून स्वागत ■ पर्यटनाचे नवे आकर्षण ठरणार**


जुन्नर : प्रतिनिधी

**गुजरातची लायन सफारी, मध्य प्रदेशची टायगर सफारीच्या बरोबरीने आता जुन्नर तालुक्यातील बिबट्या सफारी महाराष्ट्राचा मानबिंदू ठरणार आहे. मंत्रिमंडळाने जुन्नरच्या बिबट्या सफारीला मंजुरी दिल्याने जुन्नरवासीयांनी या निर्णयाचे स्वागत केले आहे. जुन्नर वन विभागाच्या अखत्यारित असलेल्या कार्यक्षेत्रात ३५०पेक्षा अधिक बिबट्यांचा संचार आहे. मात्र हे सगळेच बिबटे या सफारीत समाविष्ट होणार नाहीत; परंतु १६ बिबट्यांसाठी हा पथदर्शी प्रकल्प राबविल्यानंतर टप्प्याटप्प्याने त्याची व्याप्ती वाढण्याचे संकेत वन विभागाच्या वरिष्ठ सूत्रांनी व्यक्त केले आहेत.**

बिबट्या सफारीसाठी जुन्नर तालुक्यात जनतेने उभारलेले जनआंदोलन, माजी आमदार शरद सोनवणे यांच्यासह विद्यमान आमदार अतुल बेनके यांनी केलेल्या पाठपुराव्याचे फलित आणि त्याला उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिलेले पाठबळ, यांमुळे आता प्रत्यक्षात हा प्रकल्प साकारला जाणार आहे.

**असा असणार प्रकल्प**

जुन्नर तालुक्यात बिबट्यांचा उपद्रव असून, त्यामुळे बिबटे नकोच या मानसिकतेला हा प्रकल्प दूर करणार असल्याचे चित्र आहे. रोजगार आणि पर्यटनाला या प्रकल्पामुळे चालना मिळणार आहे. हा प्रकल्प आंबेगव्हाण येथे एकूण ५२ हेक्टरवर (१३५ एकर) उभारला जाईल. त्यातील ३० हेक्टर म्हणजे जवळपास ६० एकर क्षेत्रात प्रत्यक्ष सफारी उभारली जाणार आहे. त्यामध्ये बाहेरील भाग(आऊटर झोन), मधला भाग (बफर झोन) आणि आतला भाग (कोअर झोन) अशी रचना असेल. बाहेरील बाजूला १० फूट उंचीच्या भिंतीचे कुंपण, त्यावर सौरउर्जेवर आधारीत कुंपण केले जाणार आहे. जेणेकरून आतले बिबटे बाहेर जाऊ शकणार नाहीत. पर्यटक सफारी पहायला आल्यानंतर आतील म्हणजे बफर झोनमध्ये प्रवेश करतील, याच भागात बिबट्यांसाठी पशुवैद्यकीय दवाखाना, पर्यटकांसाठी कॅफेटेरिया असेल. त्यानंतर आतील (कोअर) झोनमध्ये दोन प्रवेशद्वारांमधून पर्यटक इलेक्ट्रीक बसच्या माध्यमातून प्रवेश करतील.



**जुन्नरच्या बिबट्या सफारीची उभारणी पहिल्यांदाच वन विभागाकडून केली जाणार आहे. त्यामुळे हा प्रकल्प निसर्गाच्या जवळ जाणारा असेल. बिबट्याच्या वर्तनशैलीचा अभ्यास करून, आवश्यक अशा बाबींचा अंतर्भाव सफारी उभारताना केला जाणार आहे.**

**अमोल सातपुते**
उपवनसंरक्षक, जुन्नर वन विभाग

पहिल्या प्रवेशद्वारातून बस आत आल्यानंतर दुसरे प्रवेशद्वार उघडेल; त्यापूर्वी पहिले प्रवेशद्वार बंद करण्याची प्रणाली असणार आहे. यामुळे आतील बिबटे बाहेर जाऊ शकणार नाहीत. अंतर्गत भागात बिबट्यांसाठी निसर्गात फिरण्याची सुविधा केली जाणार आहे, तर पर्यटकांच्या बस फिरण्यासाठी अडीच किलोमीटरच्या रस्त्यांचे जाळे असेल. दोन वाहने जाऊ शकतील, एवढी या रस्त्यांची रुंदी असेल. रस्त्यांच्या जवळपास पाण्याचे पाणवठे असतील, तेथे आलेले बिबटे पर्यटकांना बसमधून पाहता येतील. तर बिबट्यांसाठी नैसर्गिक अधिवासाची रचना असेल. त्यामध्ये झाडांना लटकवलेल्या ओंडक्यांवर किंवा तशाच स्वरूपाच्या निसर्गत वावरण्याच्या सुविधा असतील. बिबटे झाडाझुडपांच्या परिसरात वास्तव्यात असलेले पर्यटकांना पाहता येईल, अशी बिबट्या सफारीची साधारण रचना असणार असल्याचे जुन्नरचे उपवनसंरक्षक अमोल सातपुते यांनी सांगितले.

**सफारीच्या मागणीचा प्रवास**

- भाजप-शिवसेनेचे सरकार असताना तत्कालीन आमदार शरद सोनवणे यांच्या कारकीर्दीत बिबट्या सफारीची घोषणा
- बरेच दिवस जागेच्या निश्चितीबाबत निर्णय अधांतरी राहिला.
- प्रथम आंबेगव्हाण, आळंदी आणि त्यानंतर पुन्हा जुन्नर तालुक्यातले कुरण भागात प्रकल्पासाठी चाचपणी.
- जुन्नरचा बिबट्या सफारी प्रकल्प बारामतीला गेल्याच्या बातमीने खळबळ झाली.
- माजी आमदार शरद सोनवणे यांचे उपोषण
- जुन्नर तालुक्यात उभ्या राहिलेल्या जनआंदोलनाची सरकारकडून दखल
- शरद सोनवणे यांच्यासह माजी वनमंत्री सुधीर मुंगंटीवार यांनी हा प्रकल्प आंबेगव्हाण येथेच करण्यासाठी केलेल्या पाठपुराव्याचे फलित
- आमदार अतुल बेनके यांनी जनमताचा आदर करत प्रकल्पासाठी अजित पवार यांना केलेल्या आग्रहाची पूर्ती

**असा असेल प्रकल्प**

- जुन्नरची बिबट्या सफारी ठरणार राज्याच्या पर्यटनाचा मानबिंदू
- अनेक वर्षांच्या पाठपुराव्याला यश मिळाल्याने जुन्नरवासियांमध्ये चैतन्य
- १६ बिबट्यांसाठी १३५ एकरांमध्ये साकारणार प्रकल्प
- सफारी उभारणीसाठी ८० कोटी ४० लाख रुपये होणार खर्च
- बिबटे पाहण्यासाठी २५ आसनक्षमतेच्या ८ इलेक्ट्रीक बसची सुविधा
- अडीच किलोमीटर अंतर्गत रस्त्यांचे जाळे
- प्रकल्पाची उभारणी वन विभाग करणार असल्याने निसर्गाच्या जवळ जाणारा प्रकल्प ठरेल.

(पान १ वरून)

### शिरुरला शरद पवार समर्थकांचा निषेध !

उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे शहरप्रमुख संजय देशमुख, राष्ट्रवादी युवती कॉंग्रेसच्या तालुकाध्यक्षा संगीता शेवाळे, शहर अध्यक्षा स्मिता कवाद, राष्ट्रवादीचे शहर कार्याध्यक्ष हाफीज बागवान, राष्ट्रवादी लीगल सेलचे तालुकाध्यक्ष ॲड. प्रदीप बारवकर, श्यामकांत वर्षे, राहील शेख, योगेश पवार, मोहित साखला, आदित्य उबाळे, गिताराणी आढाव, किरण देशमुख, कलिम सय्यद, अक्षय सोनवणे, सचिन अभंग, राजेंद्र चोपडा, शाहनवाज शेख, परवेझ शेख, ॲड. रवींद्र खांडरे, विशाल जोगदंड, अनिकेत दसगुडे, राणी कर्डिले, सागर बोरगे आदी यावेळी उपस्थित होते.

### मराठा आरक्षणासाठी १५ फेब्रुवारीला विशेष अधिवेशन

करण्याच्या मागणीसाठी ते आमरण उपोषण करणार आहेत. मराठा समाजाला कायद्याच्या चौकटीत कायमस्वरुपी टिकणारे आरक्षण दिल्याशिवाय शांत बसणार नसल्याचे जरांगे यांनी म्हटले आहे. त्याच पार्श्वभूमीवर राज्य सरकारने बोलावलेल्या विशेष अधिवेशनात मोठा निर्णय होण्याची शक्यता आहे.

# श्रीगोंद्यात शुक्रवारी मनोज जरांगे पाटलांची सभा

**साठ एकरात होणार सभा ; तयारी पूर्ण**



श्रीगोंदा : प्रतिनिधी

**मराठा समाजाला आरक्षण मिळावे यासाठी महत्वाची भूमिका बजावणारे संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटील यांची ९ फेब्रूवारी रोजी औटेवाडी, श्रीगोंदा येथे रात्री आठ वाजता जाहीर सभा होणार आहे सकल मराठा समाजाच्या वतीने सभेची तयारी करण्यात आली आहे.**

मराठा आरक्षणासाठी मनोज जरांगे पाटील सध्या महाराष्ट्रात ठीक ठिकाणी जाहीर सभा घेऊन आरक्षणाविषयी मराठा समाजामध्ये जनजागृती करीत आहे. आरक्षणासाठी त्यांनी आजवर राज्यात अनेक ठिकाणी सभा घेतल्या आहेत.राज्य सरकारने आरक्षण जाहीर केल्यानंतर नगर जिल्ह्यात जरांगे पाटील यांची ही पहिलीच सभा होत आहे.

ही सभा श्रीगोंदा शहरानजीक जामखेड- श्रीगोंदा रस्त्यावरील वरील औटेवाडी येथे दि.९ रोजी शुक्रवारी सायंकाळी ८.०० वाजता होत आहे. सभेचे नियोजन पूर्ण झाले आहे.

मराठा समाजाला आरक्षण मिळालं पाहिजे यासाठी चळवळीच्या माध्यमातून गेल्या दहा ते पंधरा वर्षापासून मनोज जरांगे पाटील काम करत आहेत.

श्रीगोंदा येथे होणाऱ्या सभेसाठी साठ एकर जागा निश्चित करण्यात आली आहे.जेसीबी मशिनच्या सहाय्याने साफ सफाई करण्यात आली आहे. मराठा समाजाचे शेकडो तरुण गेल्या चार दिवसापासून अहोरात्र काम करत आहेत. या सभेसाठी एक लाखाहून अधिक मराठा बांधव येतील अशी माहिती सामाजिक कार्यकर्त्या भारती इंगावले यांनी दिली.

ज्येष्ठ नेते बाबासाहेब भोस, मनोहर पोटे, दादासाहेब औटी, जगन्नाथ औटी, अशोक खेंडके, भारती इंगावले यांनी सभास्थळी जाऊन पाहणी केली.

### बैलजोडी, गाय वासरु, पंजा न् चरखा ! पवारांना होती घड्याळ जाण्याची कल्पना ?

मुंबई: प्रतिनिधी

**निवडणूक आयोगाने राष्ट्रवादी पक्ष आणि चिन्ह अजित पवार गटाकडे सोपवले आहे. राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष अजित पवार यांचाच असल्याचे निवडणूक आयोगाने म्हटले. यानंतर अजित पवार गटाने समाधान व्यक्त केले. तर शरद पवार गटाने आयोगाच्या निर्णयावर टीका केली. आयोगाच्या निर्णयानंतर शरद पवारांनी सात महिन्यांपूर्वी केलेल्या एका भाषणाची चर्चा होत आहे.**



मुंबईतील वाय. बी. चव्हाण सेंटरला ५ जुलै २०२३ रोजी शरद पवारांनी यांनी पक्षातील आमदार, खासदार आणि पदाधिकाऱ्यांची बैठक बोलावली होती. या बैठकीला तरूण कार्यकर्त्यांची मोठी उपस्थिती होती. त्यावेळी शरद पवारांनी पक्षचिन्हावर भाष्य केले होते. चिन्ह गेले तरी फरक पडत नाही असा त्यांचा सूर होता. त्यासाठी त्यांनी भूतकाळातील घटनांचा दाखल दिला.

निवडणूक आयोगानं घड्याळाची खूण कोणाला दिली ते सगळ्या देशाला माहीत आहे, असे शरद पवार म्हणाले होते. अरे पुन्हा आयुष्याच्या पुन्हा पेटवा मशाली, असे आवाहन त्यांनी कार्यकर्त्यांना केले होते. आतापर्यंत आयुष्यात अनेकदा निवडणूक लढवली. १९६७ मध्ये मी पहिली निवडणूक लढवली होती. तेव्हा माझं चिन्ह बैलजोडी होती. त्यानंतर कॉंग्रेसची शकलं झाली. इंदिरा कॉंग्रेस आणि इतर कॉंग्रेस. मग आम्हाला गाय वासरु चिन्ह मिळालं. त्यानंतरच्या काळात चरखा आला. मग हाताचा पंजा मिळाला आणि त्यानंतर घड्याळ चिन्ह मिळालं, असा इतिहास पवारांनी सांगितला होता.बैलजोडीवर लढलो, हातावर लढलो, चरख्यावर लढलो, गाय-वासरुवर लढलो, घड्याळवर लढलो. काही फरक पडला नाही. कोणी काही सांगत असेल की निवडणूक चिन्ह आम्ही घेऊन जाऊ. चिन्ह जाणार नाही. जाऊ देणार नाही. पण चिन्ह घेऊन जात असाल तर कोणतंही चिन्ह असूद्या. जोपर्यंत सर्वसामान्य माणसाच्या अंतकरणात त्या पक्षाचा विचार जिवंत आहे, तोपर्यंत चिंता करण्याची कारण नाही, असे पवार म्हणाले होते.

# रंगीबेरंगी रांगोळ्यांनी सजला पारनेर पब्लिकचा आवार

## ■ प्रभू रामचंद्र, सीतेच्या रांगोळीने वेधले लक्ष
## ■ मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा उपक्रमांतर्गत स्पर्धा

**पारनेर : प्रतिनिधी**

**मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा या उपक्रमांतर्गत शैक्षणिक गुणवत्ता व व्यक्तीमत्व विकासासाठी पारनेर पब्लिक स्कुल ॲण्ड ज्युनिअर कॉलेजमध्ये आयोजित करण्यात आलेल्या विविध स्पर्धेला विद्यार्थ्यांचा उस्फुर्त प्रतिसाद लाभला. रांगोळी स्पर्धेच्या निमित्ताने रंगीबेरंगी रांगोळयांनी शैक्षणिक संकुलाचा आवार सजला होता. या स्पर्धेतील प्रभू श्रीराम व सितेची रांगोळी लक्षवेधी ठरली.**




■ पारनेर पब्लिक स्कुल ॲण्ड ज्युनिअर कॉलेज ऑफ सायन्स येथे आयोजित रांगोळी स्पर्धेत साकरण्यात आलेल्या प्रभू रामचंद्र व सीतेची रांगोळी लक्षवेधी ठरली.

शैक्षणिक गुणवत्ता व व्यक्तिमत्व विकासाच्या हेतूने विद्यालयात रांगोळी स्पर्धा, वकृत्व स्पर्धा, निबंध स्पर्धा व हस्ताक्षर स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. स्पर्धांमध्ये सहभागी विद्यार्थ्यांनी छत्रपती शिवाजी महाराजांचे जीवन, स्वच्छतेचे महत्व, आजची शिक्षण पध्दती या विषयावर निबंध लेखन करून आपले विचार शब्दबध्द केले. रांगोळी स्पर्धेमध्ये विद्यार्थीनींनी प्रभू रामचंद्र व सीतेची रांगोळी रेखाटली. ही रांगोळी या स्पर्धेत लक्षवेधी ठरली.

वकृत्व स्पर्धेमध्ये सहभागी स्पर्धक विद्यार्थ्यांनी छत्रपती शिवाजी महाराजांचे जीवन व त्यांची शिकवण यावर विचार मांडले. तर चित्रकला स्पर्धेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी आपल्यातील विविध कला गुणांचा अविष्कार घडविला.

मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा या उपक्रमांतर्गत आयोजित विविध कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शिक्षण संकुलाच्या अध्यक्षा सविता म्हस्के, दीपक जाधव प्रशांत साळवे, दत्तात्रेय काकडे, वंदना वाघमारे, अण्णासाहेब महानोर, नीलेश पवार, सुनिता खोडदे, केतकी पवळे, वनिता रेपाळे यांच्यासह विद्यालयाचे शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांनी विशेष परिश्रम घेत या स्पर्धा यशस्वी केल्या.

> **विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांचे व्यक्तिमत्व विकसित व्हावे या हेतूने गुणवत्ता व्यक्तीमत्व विकास या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या उपक्रमांतर्गत आयोजित विविध स्पर्धांना विद्यार्थ्यांचा उत्सफुर्त प्रतिसाद लाभला. या शैक्षणिक संकुलात विद्यार्थ्यांच्या सर्वांगिण विकासासाठी नेहमीच विविध उपक्रम राबविले जातात. मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा या उपक्रमामुळे त्यात आणखी भर पडली आहे.**
>
> **गिताराम म्हस्के, प्राचार्य**
> **पारनेर पब्लिक स्कुल ॲण्ड ज्युनिअर कॉलेज ऑफ सायन्स**

# पळव्याची जिक्रा शेख राज्याच्या गुणवत्ता यादीत

## शासकीय रेखाकला परिक्षेत भैरवनाथ विद्यालयाची दुसऱ्यांदा बाजी

**सुपा : प्रतिनिधी**

**तालुक्यातील पळवे खुर्द येथील श्री भैरवनाथ विद्यालयाचा शासकिय रेखाकला परिक्षेअंतर्गत घेण्यात येणाऱ्या एलिमेंटरी, इंटरमिजिएट ग्रेड परिक्षेचा निकाल १०० टक्के लागला. विद्यालयाची विद्यार्थीनी जिक्रा असिर शेख हिने इंटरमिजिएट परिक्षेच्या गुणवत्ता यादीत दहावे स्थान मिळवित विद्यालयाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला.**




■ पळवे खुर्द येथील श्री भैरवनाथ विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी शासकिय रेखाकला परीक्षेत शंभर टक्के यश संपादन केले.

एलिमेंटरी परीक्षेत श्रेया गाढवे हिने बी श्रेणी प्राप्त केली तर आठ विद्यार्थ्यांनी सी श्रेणी मिळवून या परिक्षेत यश संपादन केले. इंटरमिजिएट परिक्षेत जिक्रा शेख हिने ए श्रेणी मिळवित राज्याच्या गुणवत्ता यादीत स्थान मिळविले. याच परिक्षेत वैष्णवी मधे व सृष्टी तरटे यांनी बी श्रेणी मिळविली तर पंधारा विद्यार्थ्यांनी सी श्रेणी मिळवित यश संपादन केले.

शासकीय रेखाकला स्पर्धेच्या एलिमेंटरी व इंटरमिजिएट या दोन्ही परिक्षांसाठी तालुक्यातील पाच सेंटरवर पाच हजार विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला होता. या परीक्षांमध्ये तालुक्यातील विद्यार्थ्यांनी उज्वल यश संपादन केले आहे. कला शिक्षकांनी केलेल्या मार्गदर्शनाचे कौतुक करून तसेच यश मिळविलेल्या विद्यार्थ्यांचे तालुक्यातून अभिनंदन करण्यात येत आहे.

पळवे खुर्द येथील श्री भैरवनाथ विद्यालय संस्थेचे कार्याध्यक्ष सुहास सदाशिव शेळके, मुख्याध्यापिका वैशाली सुहास शेळके यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करीत कला शिक्षकांचे कौतुक केले. भैरवनाथ विद्यालयाच्या यशस्वी विद्यार्थ्यांना कला शिक्षक कानिफनाथ गायकवाड यांचे मार्गदर्शन लाभले.

> ### भैरवनाथ विद्यालय दुसऱ्यां गुणवत्ता यादीत
> **शासकीय रेखाकला परीक्षेत पळवे खुर्द येथील श्री भैरवनाथ विद्यालयाने राज्य पातळीवर दुस-यांदा यश संपादन केले आहे. यंदा राज्याच्या गुणवत्ता यादीत जिक्रा शेख हिने दहावे स्थान पटकाविले तर आठ वर्षांपूर्वी चैताली पळसकर हिनेही गुणवत्ता यादीत स्थान पटकावत विद्यालयास बहुमान प्राप्त करून दिला होता.**
>
> **कानिफनाथ गायकवाड**
> **तालुकाध्यक्ष, कलाशिक्षक संघटना**

> **पारनेर तालुक्यातील पळवे येथील श्री भैरवनाथ विद्यालयाची जिक्रा शेख तसेच पिंप्रीजलसेन येथील विद्यालयाची सदिच्छा जाधव या विद्यार्थीनींनी राज्य गुणवत्ता यादीत स्थान पटकाविण्याचा बहुमान मिळवून आपआपल्या विद्यालयांची तसेच कला विषयाची मान उंचावली आहे.**
>
> **संजय पठाडे**
> **जिल्हाध्यक्ष, कला शिक्षक संघटना**

# शेषमल बोरा व्यापारी असोसिएशनचे अध्यक्ष दत्तात्रेय पुजारी उपाध्यक्ष, बाळासाहेब शिंगवी सचिव



**पारनेर : प्रतिनिधी**

**पारनेर शहर व्यापारी असोसिएशनच्या अध्यक्षपदी शेषमल बोरा, उपाध्यक्षपदी दत्तात्रेय पुजारी तर सचिवपदी बाळासाहेब शिंगवी यांची बुधवारी एकमताने निवड करण्यात आली. एक वर्षे कालावधीसाठी ही निवड करण्यात आल्याचे सांगण्यात आले.**

पारनेर शहर व्यापारी असोसिएशनच्या पदाधिकारी व सदस्यांची बैठक बुधवारी ठोक व्यापारी अशोक चेडे यांच्या दालनामध्ये पार पडली. यावेळी पुढील एक वर्षासाठी पदाधिकाऱ्यांची निवड करण्यासाठी चर्चा करण्यात आली. चर्चेनंतर बोरा, पुजारी व शिंगवी यांच्या नावांवर शिक्कामोर्तब करण्यात आले.

अलिकडेच असोसिएशनची बैठक पार पडून दर शनिवारी सर्व व्यापारी अस्थापना बंद ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला होता. या निर्णयानुसार सर्व दुकाने शनिवारी बंद ठेवण्यात येत आहेत. शहरातील व्यापाऱ्यांचे विविध प्रश्न मार्गी लावण्यासाठी असोसिएशनच्या माध्यमातून पुढाकार घेण्यात येत असून सर्वसंमतीने व्यापारातील विविध बाबींवर निर्णय घेण्यात येतात. कोरोना संकटात व्यापारावर निर्बंध लादण्यात आल्यानंतर प्रशासन व व्यापारी यांच्यात समन्वय साधण्यासाठीही असोसिएशनच्या पदाधिकाऱ्यांनी पुढाकार घेत व्यापारी व प्रशासन यांच्यात सुवर्णमध्ये काढण्यात यश मिळविले होते.

नव्या व जुन्या पदाधिकाऱ्यांच्या समन्वयातून सर्व सदस्यांना विश्वासात घेउन असोसिएशनचा कारभार पाहण्यात येणार असल्याचे अध्यक्ष शेषमल बोरा, उपाध्यक्ष दत्तात्रेय पुजारी तसेच सचिव बाळासाहेब शिंगवी यांनी सांगितले. यावेळी नगरसेवक अशोक चेडे, विठ्ठलराव औटी, संतोष गांधी, अभिजित बोरा, दत्तात्रेय औटी, देवेंद्र गांधी, संजय पतके, बाळासाहेब शिंगवी, ज्ञानेश्वर औटी, प्रशांत औटी, प्रशांत शिंगवी, जालिंदर शिरसाठ, अमोल औटी, नीलेश गांधी, ओंकार पोटे, संदीप ठाणगे, अक्षय मोकाते यांच्यासह असोसिएशनचे इतर सदस्य उपस्थित होते.

# सुजित पाटलांना जनतेच्या दरबारात न्याय मिळेल !

## शिरुरचे आमदार अशोक पवार यांचा ठाम विश्वास

**शिरुर : प्रतिनिधी**

**लोकनेते स्वर्गीय माजी आमदार वसंतदादा झावरे पाटील यांनी सतत विकासाचा ध्यास घेतला. त्यांच्या कार्यकाळात पारनेर मधील खेड्यापाड्यातील रस्त्यासह अनेक विकासाचे प्रकल्प मार्गी लागले.**



त्यांच्या पावलावर पाऊल ठेवूनच सुजित झावरे पाटील यांची वाटचाल सुरू असून जनतेच्या दरबारात भविष्यात त्यांना निश्चित न्याय मिळेल, असे शिरूर-हवेलीचे आमदार अशोक पवार यांनी सांगितले.

सुजित झावरे पाटील यांच्या नगर येथील देवकृपा आमदार अशोक पवार यांनी नुकतीच भेट दिली. यावेळी सुजित झावरे यांनी अशोक पवार यांचा शाल आणि पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला. श्री पवार यांनी वसंतराव झावरे पाटील यांच्या आठवणींना उजाळा दिला.

आमदार पवार म्हणाले, लोकनेते स्व. माजी आमदार वसंतदादा झावरे पाटील आणि शिरूरचे माजी आमदार स्व. रावसाहेब दादा पवार यांचे अत्यंत जिव्हाळ्याचे संबंध होते. वसंतराव झावरे पाटील यांनी त्यांच्या आमदारकीच्या काळात विकास कामांचा डोंगर उभा केला. आता त्यांच्या पावलावर पाऊल ठेवून सुजितराव यांची वाटचाल सुरू आहे.

जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष असताना त्यांनी पारनेरला कायमच झुकते माप दिले. आणि आताही कुठलीही सत्ता किंवा पद नसतानाही केवळ लोकसंपर्काच्या बळावर आणि त्यांचे वरिष्ठ पातळीवर असणारे सलोख्याचे संबंध याच्या जोरावर त्यांनी कोट्यावधी रुपयांचा निधी पारनेरसाठी खेचून आणला आहे. त्यामुळे पारनेरमधील जनता त्यांना भविष्यात निश्चित न्याय दिल्याशिवाय राहणार नाही, असा ठाम विश्वास वाटतो.

# फुले दाम्पत्याने मुलींसाठी शिक्षणाची कवाडे खुली केली

## ■ लोकशाहीर विलास अटक यांचे प्रतिपादन ■ ढोकेश्वर विद्यालयाचे स्नेहसंमेलन

**टाकळी ढोकेश्वर : प्रतिनिधी**

**महात्मा जोतीबा फुले व सावित्रीबाई फुले या दाम्पत्याने मुलींना शिक्षण मिळावे यासाठी लोकांचे शेण, दगड, गोटे खाऊन शिक्षणाची कवाडे खुली करून दिली. शिक्षण हे वाघिणीचे दूध आहे, विद्यार्थी, विद्यार्थीनींनी अभ्यासात सातत्य ठेवत शिक्षण घेण्याचे आवाहन लोकशाहीर विलास अटक यांनी केले.**



■ ढोकेश्वर विद्यालयाच्या वार्षिक स्नेहसंमेलनात लोकशाहीर विलास अटक यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

टाकळी ढोकेश्वर येथील जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेच्या ढोकेश्वर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात वार्षिक स्नेहसंमेलनानिमित्त गाडी घुंगराची फेम लोकशाहीर विलास अटक यांच्या लोकगितांच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी त्यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना लोकशाहिरी भाषेत शिक्षणाचे महत्व पटवून दिले. मुलीस पोटात मारू नका कारण तुम्हाला वंशाचा दिवा म्हणून मुलगा हवा असेल तर दिवा लावण्यासाठी पण तीच पाहिजे असा संदेशही त्यांनी दिला.

तालुका खरेदी विक्री संघाचे अध्यक्ष ॲड. बाळासाहेब खिलारी हे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. यावेळी दिगंबर शेळके, विश्वस्त सिताराम खिलारी, प्राचार्य बाळासाहेब करंजुले, प्राचार्य सुनील वाव्हळ, पर्यवेक्षक शिवाजी सावंत, माजी सरपंच शिवाजी खिलारी, बाजार समितीचे मा. व्हा. चेअरमन विलास झावरे, सोसायटीचे व्हा. चेअरमन मोहन रांधवन, पत्रकार शरद झावरे, गणेश जगदाळे, बाळासाहेब गायकवाड, श्रीनिवास शिंदे, संकेत झावरे, भगवान वाळुंज, अन्वर हवालदार, चंद्रकांत सोनावळे, अमित कडूस्कर, गणेश चव्हाण, प्रा. सतिश फापाळे, बापूसाहेब होळकर, प्रा. विजय दळवी बापूसाहेब रांधवन, जयराम गागरे, पांडूरंग गटारे, गणेश बांडे, पोपट दूस, भागुजी झावरे, बाबासाहेब झावरे, ज्ञानदेव पायमोडे यांच्यासह पालक, ग्रामस्थ, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी विद्यार्थी उपस्थित होते. मोरेश्वर घोरपडे यांनी सुत्रसंचलन तर कल्पना जाधव यांनी आभार मानले.

# जुन्या एमआयडीसीतील रस्त्यांची दुरावस्था

## रस्त्यांच्या दुरूस्तीसाठी मनसेचा आंदोलनाचा इशारा

**सुपा : प्रतिनिधी**

**सुपा येथील जुन्या एमआयडीसीमध्ये रस्त्यांची दुरावस्था झाली असून या रस्त्यांच्या दुरूस्तीसाठी मनसेचे तालुका उपाध्यक्ष रविश रासकर यांनी आंदोलनाचा इशारा दिला आहे.**



या दुरावस्थेबाबत रासकर यांनी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या नवनागापूर, नगर येथील कार्यालयाकडे निवेदन सादर केले असून तीस दिवसांच्या आत या रस्त्यांची दुरूस्ती झाली नाही तर आंदोलन छेडण्याचा इशारा दिला आहे.

निवेदनात नमुद करण्यात आले आहे की, औद्योगिक वसाहतीमधील रस्ते अतिशय खराब झालेले असून त्यावर मोठ मोठे खडडे पडले आहेत. एमआयडीसीच्या अधिकाऱ्यांचे त्याकडे लक्ष नाही. दुसरीकडे रस्त्याची दुरावस्था झालेली असताना वसाहतीमधील दोन कंपन्यांमध्ये विविध प्रकारचा माल घेऊन येणाऱ्या व घेऊन जाणाऱ्या वाहनांच्या रांगा याच रस्त्यावर लागलेल्या दररोज पहावयास मिळतात. रस्त्यावरच गाडयांची पार्कींग करण्यात आल्याने या रस्त्यांवरून प्रवास करणाऱ्या शेतकरी तसेच इतर नागरीकांना त्याचा त्रास होतो. शेतकरी व इतरांनी रासकर यांच्याकडे केलेल्या तक्रारीनंतर त्यांनी एमआयडीसीच्या नगर कार्यालयाकडे निवेदन देऊन रस्ते दुरूस्ती तसेच मालवाहू वाहनांच्या पार्किंगबाबत निवेदन सादर केले.

औद्योगिक वसाहतीमध्ये काम करणारे कामगार दोन पाळयांमध्ये काम करतात. त्यांना याचा रस्त्याचा वापर करावा लागतो. कामगारांबरोबरच शेतकरी तसेच इतर प्रवाशांसाठी या रस्त्याचा वापर होतो. रस्ता खराब झाल्याने तसेच खराब रस्त्यांवर वाहनांची पार्कींग करण्यात येत असल्याने अपघातांना आमंत्रण मिळत असल्याचे रासकर यांनी म्हणणे आहे.

या रस्त्यांची दुरूस्ती करण्यात यावी, रस्त्यावर वाहने पार्कींग करणाऱ्या कंपन्यांनी कंपनीच्या आवारात पार्किंगची सोय करावी तसे न झाल्यास नगर येथील औद्योगिक वसाहतीच्या कार्यालयासमोर तिव्र स्वरूपाचे आंदोलन छेडण्यात येईल असे या निवेदनात नमुद करण्यात आलो आहे. रविश रासकर यांनी सहाययक अभियंता राहुल बळे, उपअभियंता संदीप बडगे यांना निवेदन सादर केले.

# कोरठण गडावर गगनगिरी महाराज पुण्यतिथी सोहळा

## गगनगिरींच्या प्रतिमेची पालखीतून मिरवणूक

**पिंपळगांव रोठा : प्रतिनिधी**

**राज्यातील लाखो भाविकांचे कुलदैवत असलेल्या कोरठण खंडोबा देवस्थान या राज्यस्तरीय ब वर्ग तिर्थक्षेत्री गगनगिरी महाराज पुण्यतिथी सोहळा मोठया उत्साहात संपन्न झाला. सकाळी ९ वाजता महाभिषेक, अभिषेक, पुजा, होमहवन, आरती पुरोहीत बाळासाहेब पाटील, शंकर गायकवाड, सुशिलाबाई गायकवाडद्ध अशोक घोडके व कमल घोडके यांच्या हस्ते करण्यात आली.**



सकाळी १० वाजता गगनगिरी महाराज यांच्या प्रतिमेची पालखीतून मिरवणूक काढण्यात आली कोरठण गडाला प्रदिक्षिणा घालण्यात आल्यानंतर मिरवणूकीची सांगता झाली. मिरवणूकीत भविक, भक्त, शालेय विद्यार्थी, ग्रामस्थ मोठया संख्येने सहभागी झाले होते. महाराजांच्या प्रतिमेची महाआरती सभामंडपात झाल्यानंतर खंडेश्वर वारकरी शिक्षण संस्थेचे आकाश महाराज घोलप यांचे गगनगिरी महाराज यांच्या जीवन चरित्रावर संगितमय प्रवचन झाले.

दुपारी बेल्हे, ता. जुन्नर येथील संकल्प विश्वासराव या भक्तांच्या वतीने तसेच जय गगनगिरी सेवाभावी मंडळ, पिंपळगांवरोठा यांच्या वतीने उपस्थित भाविकांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. जय मल्हार विद्यालयाच्या विद्यार्थी व विद्यार्थीनींनी महाप्रसाद वितरणाचे सुयोग्य नियोजन केले होते. यावेळी देवस्थानचे उपाध्यक्ष महेश शिरोळे, जालिंदर खोसे, रामदास मुळे, धोंडीभाऊशेठ जगताप, मा. सरपंच शिवाजी ढोमे, बन्सी ढोमे, गोपीनाथ सुंबरे, लक्ष्मणनाना सुंबरे, किसन भिकाजी घुले, पंढरीनाथ वाळुंज, लहू सुंबरे, भाऊसाहेब घुले, बेल्हेकर काठी पालखीचे मानकरी अध्यक्ष संतोष खोमणे, संकल्प विश्वासराव, धोंडीभाऊ पाबळे,रमेश विश्वासराव, नितिन विश्वासराव, सोमनाथ जाधव, गोपीनाथ घुले, तानाजी मुळे, भगवान भांबरे, अशोक झिंजाड, देवस्थान व्यवस्थापक भाऊसाहेब पुंडे यांच्यासह विद्यार्थी, शिक्षक, कर्मचारी भाविक यावेळी मोठया संख्येने उपस्थित होते.

# ढुमणे यांनी क्रीडा क्षेत्राला नावलौकीक मिळवून दिला

## ■ मा. उपमहापौर दिपक मानकर यांचे गौरोद्गगार
## ■ राजेंद्र ढुमणे यांचा सेवापुर्ती समारंभ

**निघोज : प्रतिनिधी**

**लोकसहभागातून खेळाडूंना परदेशात प्रशिक्षणासाठी पाठवून पुणे शहरात क्रीडा अधिकारी राजेंद्र ढुमणे यांनी क्रीडा क्षेत्राला नावलौकीक मिळवून दिल्याचे गौरवोद्गार पुण्याचे माजी उपमहापौर दिपक मानकर यांनी काढले.**



तालुक्यातील अळकुटी येथील रहिवासी राजेंद्र ढुमणे हे ३९वर्षांच्या प्रदीर्घ सेवेनंतर पुणे महापालिकेच्या शिक्षण विभागातून क्रीडा अधिकारी पदावरून निवृत्त झाले. त्यांच्या सेवापुर्ती कार्यक्रमात मानकर यांनी ढुमणे यांच्या क्रीडा क्षेत्रातील योगदानाचे कौतुक केले.

यावेळी शिक्षण मंडळाचे अध्यक्ष बाबा धुमाळ, उपाध्यक्ष आप्पा रेणुसे, सह आयुक्त शिवाजी दौंडकर, उपायुक्त राजीव नंदकर, शिक्षणधिकारी काळे, प्रदीप चोरबेले आदी उपस्थित होते.

यावेळी बोलताना मानकर म्हणाले, खेळाडूंमधील गुणांची पारख करून ढुमणे यांनी लोकसहभागातून खेळाडूंना प्रशिक्षणासाठी पाठविले. त्यांच्या लोकसहभागासाठी आपणही मदत केलेली आहे. ती केवळ ढुमणे यांची कार्यक्षमता, खेळाविषयी असलेली तळमळ पाहूनच असे मानकर यांनी स्पष्ट केले. ढुमणे यांनी नगर जिल्हयातून येऊन पुण्यातील क्रीडा विभागाचा नावलौकीक वाढविण्यासाठी प्रयत्न केले हा खऱ्या अर्थाने नगर जिल्हयाचा सन्मान आहे.

सत्काराला उत्तर देताना ढुमणे म्हणाले, तालुक्यातील अळकुटी, बाभुळवाडे येथे प्राथमिक तर नगर येथे महाविद्यालयीन शिक्षण पुर्ण केले. सुरूवातीपासून खेळाची आवड असल्याने क्रीडा विभागात काम करण्याचा योग आला. पुणे जिल्हयात कान्हूर मेसाई येथे १६ वर्षे शिक्षक म्हणून काम पाहिले. पुढे पुण्यात क्रीडा विभागात क्रीडा अधिकारी म्हणून काम करण्याचा अनुभव मिळाला. उपमहापौर दिपक मानकर, आयुक्त, उपायुक्त यांनी मार्गदर्शन करीत मोलाचे सहकार्य केले.

> **राज्याच्या लौकीकासाठी काम करणार आपल्या मार्गदर्शनाखाली असंख्य खेळाडू राज्य, राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय स्पर्धेत सहभागी झाले याचा अभिमान आहे. सेवानिवृत्त झालो असलो तरी शहरी व ग्रामीण खेळाडूंना आंतरराष्ट्रीय पातळीपर्यंतच्या स्पर्धांमध्ये कसे सहभागी होता येईल तिथे त्यांना कसे यश प्राप्त करता येईल यासाठी पुढाकार घेउन राज्याचा लौकीक वाढविण्यासाठी आपण काम करणार आहोत.**
>
> **राजेंद्र ढुमणे**
> **निवृत्त क्रीडा अधिकारी**

'पारनेर दर्शन' हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक देविदास रामभाऊ आबूज यांनी ओंकार ऑफसेट, कॉलेज रोड, पारनेर ४१४३०२ अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून 'पारनेर दर्शन' कार्यालय, कॉलेज रोड,पारनेर ४१४३०२,जि.अहमदनगर (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले. संपादक : देविदास रामभाऊ आबूज मोबा.९४२१४७८२८३ ई- मेल : deviabuj@gmail.com
'PARNER DARSHAN' Printer,Publisher And Ower By DEVIDAS RAMBHAU ABUJ Printed At OMKAR OFSSET Collage Road,PARNER-414302 Dist-Ahmednagar (M.S)
Editor-DEVIDAS RAMBHAU ABUJ ▪ Mob : 9421478283 ▪ Email : deviabuj@gmail.com